## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी

**निशाणी क्र. १८**

शपथेवर निवेदन करतो की,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| माझे नांव | – | गणेश विश्वनाथ भारती | | | |
| माझे वय | – | ३९ वर्षे | व्यवसाय | – | ए.एस.आय. |
| | | | ब.नं. ११८२, पो.स्टे. शिराढोण | | |
| राहणार | – | शिराढोण | तालुका | – | कळंब |
| जिल्हा | – | उस्मानाबाद | | | |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री.ए.एन.गवळी यांचेकडुन**

१) मी शिराढोण पोलीस स्टेशन येथे गेल्या दोन वर्षापासुन कार्यरत आहे. दिनांक २४/०२/२०२२ रोजी माझी नाईट गस्तची डयुटी होती. पोलीस स्टेशनला रायगव्हाणचे ग्रामसुरक्षा दलामधील भिसे या व्यक्तीचा फोन आला. त्यांनी दोन इसम लपून बसलेले असल्यामुळे त्यांना पकडून ठेवले असल्याचे आम्हाला सांगीतले. त्यांच्यावर बॅटरीचा प्रकाश टाकला असता ते घाबरले. त्यांना ग्रामसुरक्षा दलातील लोकांनी नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांना चुकीची माहीती सांगीतली. फोन आल्यानंतर जवळपास अर्धा तासाच्या आत आम्ही घटनास्थळी पोहंचलो.

२) घटनास्थळी जावून दोन्ही आरोपींना आम्ही ताब्यात घेतले व आरोपींकडे विचारपूस केली. आरोपींनी त्यांच्याजवळ कटर असल्याचे दाखवले. त्यांच्याजवळ एक कटावणी, एक ते दिड फुटाचा गज होता. तसेच त्यांच्या जवळ चावी नसलेली व नंबर नसलेली एक स्प्लेंडर गाडी होती. सदर घटनास्थळी जप्त केलेल्या वस्तुंचा झडती पंचनामा केला व सदरचे साहीत्य जप्त करुन ताब्यात घेतले.

३) पोलीस स्टेशनला आल्यानंतर दोन्ही आरोपींनी विचाणांअंती आम्हाला त्यांची खरे नावे व पत्ते सांगीतले. राम विष्णु काळे व अक्षय जंगम अशी नांवे सांगीतली. पुढील तपास बोडके यांच्याकडे देण्यात आला. मी सरकारतर्फे फिर्याद दिली. सदर

फिर्यादीमधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादीस **निशाणी क्र. १९ देण्यात** येतो. सदर घटनेचा प्रथम खबरी अहवाल देखील मीच नोंदवला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर प्रथम खबरी अहवाल **निशाणी २० वर** आहे.

४) आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या वस्तुसंदर्भात जो जप्ती पंचनामा करण्यात आला होता तो दाखविण्यात आला असता, हा तोच पंचनामा असुन त्यावर साक्षीदार यांची सही असल्याचे साक्षीदाराने सांगीतले. तसेच माझी देखील सही त्यावर आहे. सदर जप्ती पंचनामा **निशाणी २१ व २२ वर** आहे. आरोपी राम याच्याकडून एक कटावणी आणि दिड फुटाचा गज ज्यावर तिरप्या रेषा होत्या या वस्तु जप्त केल्या. आरोपी अक्षय काळे याच्याकडून वरील प्रमाणे मोटारसायकल (नंबर नसलली), कटर या वस्तु जप्त करण्यात आल्या. मी सदरील वस्तू पाहील्यास ओळखू शकेल. तसेच सदरील वस्तू न्यायालयात जमा करु शकेल. दोन्ही आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

## उलट तपासणी आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.ए.सी.चोंदे यांचेकडून

५) सुधाकर तोटावर हे माझे सहकारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भिसे हे इसम देखील माझ्या ओळखीचे आहेत. रायगव्हाण हे गाव रांजणी गावालगत आहे. रांजणी गावात एक नॅचरल शुगर हा कारखाना आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळेस सदरचा कारखाना देखील चालू अवस्थेत होता. हे म्हणणे खरे आहे की, रांजणी कारखान्याकडून रायगव्हाण मार्गे मुरुडला जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, नोकरीला येणार जाणारे लोकांची त्यामुळे सदर रस्त्याला वर्दळ असते.

६) भिसे यांचा फोन आल्यानंतर पोलीस स्टेशनवरुन निघताना आम्ही स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. मला स्टेशन डायरीचा नोंद क्रमांक सांगता येणार नाही. मला घटनेदिवशी रात्री अंदाजे ११.३० च्या आसपास भिसे यांचा फोन आला होता. शिराढोण ते रायगव्हाण हे अंतर जवळपास ४ ते ५ कि.मी. एवढे आहे व

सरकारी चारचाकी वाहनास शिराढोण वरुन रायगव्हाणला जाण्यासाठी १५ ते २० मिनीट लागतात.

७) पोलीस स्टेशनला आल्यानंतरच आरोपींच्या नावाबद्दल खात्री झाली व तशा पंचनाम्यात आरोपींच्या नावाच्या नोंदी घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, दुसरे दिवशी पंचाच्या सहया घेतल्या. रायगव्हाण येथील पंचनामा हा जवळपास ३० ते ४० मिनीटे चालला. पंचनाम्याच्या वेळेस पुरी नावाचा एक पंच होता. दोन नंबरचा पंचाचे नक्की नाव मला सांगता येत नाही.

८) तथाकथीत घटनेच्या पंचनाम्याच्या वेळेस १५ ते २० लोक हजर होते. आरोपींची ज्यावेळेस अंगझडती घेतली होती, त्यावेळेस आरोपींनी कोणते कपडे परिधान केले होते त्याचा रंग मला सांगता येत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, आरोपींनी जिन्स पॅन्ट व टी–शर्ट असे कपडे परिधान केले होते. अंगझडती घेण्यापुर्वी आम्ही आरोपींना विचारणा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, अंगझडती पंचनाम्याच्या वेळेस आरोपींच्या ताब्यातून काहीही मिळाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर दुसरे दिवशी पंचांच्या सहया घेऊन सदरचा पंचनामा पोलीस स्टेशनला तयार केला.

९) तथाकथीत घटना घडल्यानंतर आरोपींना घेऊन पोलीस स्टेशनला आल्यानंतर सदर घटनेची नोंद स्टेशन डायरीला केली होती. मुद्येमाल गज हा दिड फुट असल्याचे मी फिर्याद देताना सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादीमध्ये मुद्येमाल गज व कटावणी याचे मोजमाप नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या फिर्यादीत घटनास्थळी जाण्यासाठी आर्धा तास लागल्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादी मध्ये देखील मी झडती पंचनामा केल्याचा व साहित्य जप्त केल्याचा उल्लेख नाही.

१०) हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी आरोपी मिळून आले व त्यांच्याकडून वर नमुद साहीत्य जप्त केल्याचे व मी माझा संपुर्ण सरतपास खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोटा पुर्ण करण्यासाठी आरोपीविरुध्द खोटा गुन्हा

दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास पुर्ण</u>.

<u>फेरतपास नाही</u>.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

दिनांक– २३/०३/२०२३.

MOHSIN ASLAM SHAIKH

Digitally signed by MOHSIN ASLAM SHAIKH
Date: 2023.03.27 11:36:53 +0530

(एम.ए.शेख)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(कोर्ट क्र.३), कळंब.